मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दिनांक १२ ऑक्टोंबर २०२३। पान १

# नागरिकांना एका क्लिकवर मिळणार पालिका सुविधांची इत्यंभूत माहिती : आयुक्त

## सिटिझन जिओपोर्टलचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते उदघाटन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** नागरिकां साठी ऑनलाइन सेवा सुलभ करणे आणि महानगरपालिकेच्या विभागांच्या अंतर्गत प्रशासन कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड मनपा व स्मार्ट सिटी लि. यांच्या संयुक्त विद्यमानाने जीआयएस सक्षम इआरपी प्रणाली हाती घेण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांना एका क्लिकवर इत्यंभूत सेवांची माहिती देण्यासाठी सिटिझन जिओपोर्टल सूरू करण्यात आले असून, या पोर्टलचे आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांच्या हस्ते आज, दि. ११ रोजी उदघाटन करण्यात आले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रा. रामकृष्ण मोरे, प्रेक्षागृह चिंचवड येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी अनिता कोटलवार, विजय बोरुडे यांच्यासह एटॉस इंडियाचे प्रकल्प संचालक अविनाश पाटील, नॅसेंट प्रकल्प व्यवस्थापक डॉ. प्रशांत परसाई, केपीएमजी प्रकल्प व्यवस्थापक कल्पेश बोंडे, सिताराम फुले आदी उपस्थित होते. प्रसंगी, व्हिडिओ चित्रफीतीद्वारे सदर प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. या प्रकल्पाबाबत आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, भारत सरकारच्या स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड मार्फत जीआयएस सक्षम ईआरपी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये ६ सॅप मॉड्यूल्स, २५ नॉन-कोर आयटी ऍप्लिकेशन्स, डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टम आणि भौगोलिक माहिती प्रणाली चा समावेश आहे.

### मनपा ठिकाणांची मिळणार माहिती

- » आरोग्य सेवा (उदा. रुग्णालयांची ठिकाणे)
- » आपत्कालीन सेवा (उदा. फायर ब्रिगेडची ठिकाणे)
- » शैक्षणिक सुविधा (उदा., सरकारी शाळांची ठिकाणे)
- » क्रीडा सुविधा (उदा. झउचउ क्रीडा सुविधा)
- » पर्यटन ठिकाणे (उदा. गार्डन्स आणि स्मारके)
- » सामुदायिक सेवा (उदा. कम्युनिटी हॉल)
- » वाहतूक (उदा. मेट्रो आणि बीआरटीएस थांब्यांची ठिकाणे, रेल्वे स्थानके)
- » सिटिझन जिओ पोर्टलद्वारे मिळणार या सुविधा

याद्वारे नागरिकांना पिंपरी चिंचवड पालिकेच्या इत्यंभूत सेवा-सुविधांची माहिती व ठिकाणे नकाशावर एका क्लिकवर पाहता येणार आहेत. तसेच, याचा फायदा पिंपरी चिंचवडमधील नागरिक, मनपा कर्मचारी यांनाच नव्हे तर आसपासच्या परिसरातील अभ्यांगतांना देखील होणार आहे. पारदर्शक प्रशासन व नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी ही प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे. जिओपोर्टल सुविधा तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका वेबसाइटव आपले शहर जाणून घ्या आयकॉन अंतर्गत उपलब्ध आहे, यातून शहरातील लहान रस्त्यांची व ठिकाणांची माहिती नागरिकांना होणार आहे.

# वाघेश्वर मंदिर परिसरात होणार 'परंपरा-संस्कृती जतन'

## प्रशासनाच्या माध्यमातून लवकरच कामाला सुरूवात

**चऱ्होली न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड शहरातील ऐतिहासिक महत्त्व असलेले चऱ्होली बुद्रुक येथील श्री वाघेश्वर मंदिर आणि परिसराचे अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सुशोभिकरण करण्यात येणार आहे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने या ठिकाणी मोठी यात्रा वर्षानुवर्षे भरते. येथील बैलगाडा घाटही प्रसिद्ध आहे. त्यामुळे 'परंपरा आणि संस्कृतीचे जतन' करण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे आणि माजी महापौर नितीन काळजे यांनी याबाबत पुढाकार घेतला असून, प्रशासनाच्या माध्यमातून लवकरच कामाला सुरूवात करण्यात येणार आहे. महापालिका प्रभाग क्रमांक ३ चऱ्होली येथील श्री वाघेश्वर मंदिराच्या सभोवताचापरिसर सुशोभिकरण करणे. या कामामध्ये येथील परंपरागत बैलगाडा शर्यत घाट, कुस्ती आखाडा याचेही नूतनीकरण करण्यात येणार आहे.

या भागात आलेले भाविक किंवा नागरिकांसाठी मंदिर परिसरातील टेकडीचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे ११ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. चऱ्होलीतील श्री वाघेश्वर महाराज मंदिर हा आपल्या अस्मितेचा आणि श्रद्धेचे स्थान आहे. पुणे जिल्ह्यातून या ठिकाणी भाविक येत असतात. समाविष्ट गावांच्या विकासाचा 'बॅकलॉग' भरुन काढण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला. 'मोशी-चिखली-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित होत आहे. नागरिकांना मोकळा श्वास घेता यावा, अशी ठिकाणे विकसित करणे काळाची गरज आहे. त्यामुळे भौगोलिक वैभवसंपन्न चऱ्होली आणि वाघेश्वर मंदिर परिसरात 'आपली परंपरा आणि संस्कृती'चे जतन होणार असून, या परिसराचे भव्य सुशोभिकरण करण्यासाठी आम्ही सर्वो तोपरी प्रयत्न करणार आहोत, असे आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

### सुशोभिकरणासाठी 'उत्सव थीम'

» श्री. वाघेश्वर मंदिर आणि टेकडी परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी 'उत्सव थीम'चा निश्चित करण्यात आली आहे. हा उत्सव संस्कृतीचा आणि पारंपरिक क्रीडा प्रकारांचा असेल. त्याद्वारे कुस्ती आखाडा, बैलगाडा घाट, टेकडीच्या उतारावर जलसंधारण, भक्ती आणि शक्तीचे प्रतिक असलेली प्रभू श्रीराम भक्त हनुमान यांच्या गदेची प्रतिकृती, कुस्तीपटूंचे शिल्प, बैलगाडा शिल्प असे आकर्षन असणार आहे.

# गहुंजे येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेसाठी विशेष पीएमपीएमएल बस!

## क्रिकेटप्रेमींची गैरसोय होऊ नये यासाठी पीएमपीएमएल तर्फे विशेष बस

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** गहुंजे येथे आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक २०२३ स्पर्धेचे ५ सामने होणार आहेत. या स्पर्धेला जाण्याऱ्या क्रिकेटप्रेमींची गैरसोय होऊ नये यासाठी पीएमपीएमएल तर्फे विशेष बस सुविधा पुरविण्यात येणार आहे.






सामन्यांचे वेळापत्रक देखील जाहीर झाले आहे. त्यास अनुसरून पीएमपीएमएल कडून (त्र्हहींपक्षश) गहुंजे स्टेडियम साठी पीएमपीएमएल कडून पुणे मनपा भवन, कात्रज व निगडी टिळक चौक बस स्थानक या तीन ठिकाणांहून बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच क्रिकेट शौकिनांची गर्दी वाढल्यास आवश्यकतेनुसार तीनही बसस्थानकांवरून जादा बसेसचे नियोजन करण्यात येईल असे ही पीएमीएमएल तर्फे सांगण्यात आले आहे. या बस सुविधेचा तपशील खालील प्रमाणे (१९ व ३० ऑक्टोबर ,१ व ८ नोव्हेंबर) १) पुणे मनपा भवन बस स्थानक – सकाळी ११वा.,सकाळी ११वाजून ३५ वा. दुपारी १२ वाजून ५ मिनिटे ( तिकीट दर जाताना व येताना व्यक्तीसाठी प्रत्येकी १०० रूपये) २) कात्रज बायपास बस स्थानक – सकाळी ११ वा., सकाळी ११.३० वा (जाताना व येताना प्रत्येक तिकिट दर व्यक्तीसाठी प्रत्येकी १०० रूपये) ३) निगडी टिळक चौक बस स्थानक दुपारी १२ वा.,दुपारी १२.३० वा.(जाताना व येताना प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येकी ५० रूपये) ११ नोव्हेंबर चे बस नियोजन १) पुणे मनपा भवन बस स्थानक सकाळी ८.२५ वा.,सकाळी ८.५० वा.सकाळी ९.०५ वा.(जाताना व येताना प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येकी १०० रूपये) २) कात्रज बायपास बस स्थानक सकाळी ८.१५ वा.,सकाळी ८.३५ वा.(जाताना व येताना प्रत्येक माव्यक्तीसाठी प्रत्येकी १०० रूपये) ३) निगडी टिळक चौक बस स्थानक- सकाळी ८.३० वा., सकाळी ९ वा.(जाताना व येताना प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येकी ५० रूपये)

# पीएमआरडीए'चा अनागोंदी कारभार

## अनेक अधिकारी एकाच जागी तळ ठोकून

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** वाढत्या नागरीकरणामुळे पुणे शहर व जिल्ह्यातील भागात नियोजित विकास व्हावा म्हणून स्थापन केलेल्या पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) मध्ये राज्य सरकारकडून प्रतिनियुक्तीवर आलेले वरिष्ठ अधिकारी आपली जागा सोडायला तयार नाहीत. प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी नियमानुसार तीन वर्षेच एका जागेवर काम करू शकतात. मात्र, येथील अधिकारी मंत्रालयात 'मोर्चेबांधणी' करून, या विभागातून त्या विभागात जातात व वर्षानुवर्षे 'पीएमआरडीए'मध्येच तळ ठोकून आहेत. पुणे, पिंपरी-चिंचवड व पुणे जिल्ह्यात झपाट्याने होत असलेल्या नागरीकरणामुळे या परिसरात वाहतूक कोंडी, पिण्याचे पाणी,




सुयोग्य रस्ते या सारखे नागरी सुविधांचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न सुटावेत, यासाठी 'पीएमआरडीए' २०१५ मध्ये स्थापन करण्यात आली.

सहाजिकच विकास कामांच्या अनुषंगाने या संस्थेला खूप महत्त्व प्राप्त झाले. इमारतींच्या बांधकाम परवान्यापासून ते विविध विकास कामांच्या परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्रे येथूनच दिले जातात. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या दृष्टीने हे एक मोठे 'कुरण' झाले आहे. अनेक वर्षे तळ ठोकून असलेल्या अधिकाऱ्यांबाबत नगररचना संचालनालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अहवाल राज्य सरकारकडे जाऊनही त्यावर काही कार्यवाही होत नाही. पीएमआरडीएमध्ये पुणे जिल्हातील ९ आमदारांचे कार्यक्षेत्र आहे. अधिकारी काम करत नसल्याची बहुतांश आमदारांच्या तक्रारी आहेत. सध्या कंत्राटी कर्मचारी २५०, सुरक्षा रक्षक ३६, अधिकाऱ्यांना वाहन पुरवठा २४, चालक २४ यांचे अनेक महिन्यांपासून वेतन अनियमित व काहींचे थकीत आहे.

# त्या फौजदाराने जिंकले ड्रीम ११ वर दीड कोटी रुपये

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड शहर पोलीस दलातील एक पोलीस फौजदार चक्क एका दिवसात करोडपती झाला आहे. ड्रीम ११ मध्ये क्रिकेटच्या सामन्यावर टीम लाऊन फौजदाराने तब्बल दीड कोटी रुपये जिंकले आहेत. पोलीस फौजदार सोमनाथ झेंडे असे एका दिवसात करोडपती झालेल्या नशीबवान अधिकाऱ्याचे नाव आहे. सोमनाथ झेंडे हे पिंपरी चिंचवड पोलिसांच्या मुख्यालयातील आरसीपी मध्ये नेमणुकीस आहेत. त्यांना क्रिकेटची आवड असल्याने ते सध्या सुरू असलेल्या क्रिकेटच्या सामन्यांवर ड्रीम ११ या



ऑनलाइन खेळामध्ये आपली टीम लावून सहभागी होत असत. दरम्यान मंगळवारी (दि. १०) झेंडे यांनी ड्रीम ११ या खेळामध्ये बांगलादेश विरुद्ध इंग्लंड या क्रिकेट सामन्यात सहभाग घेतला. त्यामध्ये त्यांना पहिल्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. बक्षिसाची रक्कम एक कोटी ५० लाख एवढी आहे. एका दिवसात झेंडे यांचे नशीब पालटले असून ते करोडपती झाले आहेत.

# पुण्यासाठी १२.८२ टीएमसी पाणी कोटा मंजूर!

## जास्त पाणी वापरल्यास महापालिकेला तीन पट दंड

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहराची वाढणारी हद्द, लोकसंख्या याचा विचार करून पुणेकरांना वर्षाला २०.९० टीएमसी पाणी मिळावे अशी मागणी महापालिकेने पाटबंधारे विभागाकडे केलेली होती. त्यास ठेंगा दाखवत पाटबंधारे विभागाने खडकवासला आणि भामा आसखेड धरण प्रकल्पातून केवळ १२.८२ टीएमसी पाणी साठा २०२३-२४ या वर्षासाठी मान्य केला आहे.

त्यामुळे यापेक्षा जास्त पाणी वापरल्यास महापालिकेला तीन पट दंडाचा भूर्दंड सहन करावा लागणार आहे. पाटबंधारे विभागाने यासंदर्भात आदेश काढले आहेत. राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महापालिकेला दरवर्षी जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत पाटबंधारे विभागाला पाण्याचे अंदाजपत्रक सादर करावे लागते. २०२२-२३ या वर्षी महापालिकेने २०.३४ टीएमसी पाण्याची मागणी केली असताना पाटबंधारे विभागाने १२.४१ टीएमसी पाणी कोटा उपलब्ध करून दिला होता. त्यानंतर महापालिकेने २०२३-२४ या वर्षासाठी अंदाजपत्रक सादर केले. यामध्ये महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावांची दोन टक्के वाढलेली लोकसंख्या, पुण्यात नोकरी, व्यवसाय, शिक्षणासाठी रोज ये जा करणारे नागरिक अशी एकूण ७२ लाख लोकसंख्येला पाणी द्यावे लागणार आहे. तसेच ३५ टक्के पाणी गळतीचा याचा विचार करून २०.९० टीएमसी कोटा मंजूर करावी अशी मागणी महापालिकेने केली होती. महापालिकेच्या पाणी वापराचा दावा पाटबंधारेने खोडून काढत १२.८२ टीएमसी पाणी कोटा १ जुलै २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीसाठी मान्य केला आहे. यामध्ये महापालिकेने ३४ समाविष्ट गावे आणि १६ संस्थांची लोकसंख्या १० लाख गृहित धरून त्यासाठी २.३६ टीएमसी पाणी कोटा मागितला होता. पण पाटबंधारे विभागाने ही मागणी नाकारत या गावांना आणि संस्थांना आम्ही पाणी देत आहोत असे स्पष्ट केले आहे. तसेच महापालिकेने ३५ टक्के म्हणजे ७.१३ टीएमसी पाणी गळती होत असल्याचे नमूद केले होते. पण पाटबंधारे विभागाने ही गळती केवळ १३ टक्के गृहीत धरून त्यासाठी १.४७ टीएमसी इतकी धरली आहे. त्यामुळे महापालिकेने मागणी केलेल्या कोट्यापेक्षा १२.८२ टीएमसी इतके पाणी महापालिकेला मिळाले आहे.



### गेल्यावर्षी केवळ ०.४१ टीएमसी पाणी जास्त

» महापालिकेला गेल्यावर्षी २०.३४ टीएमसी पाणी मागितले होते, त्यापैकी १२.४१ टीएमसी पाणी कोटा मंजूर झाला होता. यंदा २०.९० टीएमसी पाणी मागितलेले असताना १२.८२ टीएमसी पाणी मिळाले आहे. गेल्यावर्षी तुलनेत केवळ ०.४१ टीएमसी पाणी जास्त मंजूर झाले आहे.

# ललित पाटील तुमच्या ताब्यात होता, तुम्हाला नीट सांभाळता आलं नाही का?

## ललित पाटील प्रकरणावरुन न्यायाधीशांनी पुणे पोलिसांना झापले

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** ड्रग्स तस्कर ललित पाटीलचा भाऊ भूषण पाटील सह अभिषेक बलकवडे या दोघांना पुणे सत्र न्यायालयाने पाच दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली आहे. दोन्ही बाजूच्या वकिलांचा युक्ती वाद ऐकल्यानंतर कोर्टाने हा आदेश दिला आहे. मात्र मुख्य आरोपी ललित पाटील पोलिसांच्या हातून पळून गेल्यानंतर तुम्ही इतर लोक गोळा करून काय तपास करणार आहे ? थेट सवाल करत न्यायाधीश बिराजदार यांनी पोलिसांचे कान टोचले आहेत. ससून रुग्णालयात ड्रग्स तस्कर ललित पाटील पोलिसांना गुंगारा देऊन फरार झाल्यानंतर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. ललित पाटील गेल्या ९ महिन्यांपासून ससून रुग्णालयात उपचार घेत होता. ससून रुग्णालयातून तो त्याची सूत्रं फिरवत ड्रग्सची तस्करी करत होता. याची माहिती अंमली पदार्थ पथकाच्या पोलिसांना



मिळाली होती. त्यानंतर अंमली पदार्थ च्या विशेष पथकाने २ कोटींचे मेफेड्रोन ड्रग्स ससून रुग्णालयाच्या दारातून जप्त केले होते. त्यासोबत दोन आरोपींना अटकही केली होतं. मात्र त्याच्या रात्री ललित पाटील रुग्णालयातून फरार झाला होता. या प्रकरणानंतर पुणे पोलिसांवर मोठी टीकादेखील झाली. यानंतर पोलिसांनी तपासाचा वेग वाढवत आतापर्यंत या प्रकरणात पाच आरोपींना अटक केली आहे. भूषण पाटील (भाऊ) अभिषेक बलकवडे (साथीदार) दत्ता डोके (ड्रायव्हर) सुभाष जानकी मंडळ(ड्रग्स तस्कर) रौफ रहीम शेख( ड्रग्स तस्कर) या पाच आरोपींना आतापर्यंत पोलिसांनी अटक केली आहे. मात्र मुख्य आरोपी ललित पाटील अद्याप फरार आहे. आरोपी भूषण पाटीलसह त्याचा साथीदार अभिषेक बलकवडे याला अटक केली आहे. त्यांची आज पुणे सत्र न्यायालयात सुनावणी होती. सुनावणी दरम्यान न्यायाधीश बिराजदार यांनी पोलिसांच्या कामगिरीवर विशेष टिप्पणी करत पोलिसांचे कान टोचले आहेत. ललित पाटील तुमच्या ताब्यात असताना तुम्हाला त्याला सांभाळता आलं नाही तो पळून कसा गेला. आता या आरोपींना गोळा करून तुम्ही काय चौकशी करणार आहे? असे पोलिसांना ठणकावत फक्त ५ दिवसांची पोलीस कस्टडी दिली आहे.

# यंदाचा साखर हंगाम कधी सुरू होणार?

## मंत्री समिती बैठकीला मुहूर्त मिळेना

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

राज्यातील यंदाचा उसाचा गळीत हंगाम नेमका कधी सुरू होणार, या विषयीची अनिश्चितता वाढली आहे. दर वर्षी सप्टेंबर महिन्यात मंत्री समितीची बैठक होऊन गळीत हंगाम कधी सुरू होणार, या विषयीची तारीख जाहीर केली जात असे. यंदा अद्याप मंत्री समितीची बैठकच झाली नसल्यामुळे कारखाने, ऊसतोड मजूर आणि वाहतूकदारांमध्ये हंगाम कधी सुरू होणार, या विषयीची अनिश्चितता वाढली आहे.

राज्यातील साखर उद्योगाची एकूण आर्थिक उलाढाल १.०८ लाख कोटींवर गेली आहे. मागील वर्षी कारखान्यांनी केंद्र आणि राज्य सरकारला प्रत्येकी १७५० कोटी रुपयांचा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) दिला आहे. त्या शिवाय ३००० कोटींचा राज्य उत्पादन शुल्क भरले आहे. आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या या उद्योगाचा यंदाचा गळीत हंगाम कधीपासून सुरू करणार हे अद्याप निश्चित होत नाही. त्यासाठीची मंत्री समितीची बैठक लांबणीवर पडली आहे. कारखानदारांनी हंगामाची तयारी केली आहे. ऊसतोड मजूर आणि वाहतूकदारांशी करार केले आहेत. तरीही हंगामाची सुरुवात कधी होणार, हे निश्चित नसल्यामुळे अनिश्चितता वाढली आहे. राज्यातील खासगी साखर कारखान्यांच्या वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने (विस्मा) १५ ऑक्टोबरपासून यंदाचा गळीत हंगाम सुरू करावा, अशी मागणी राज्य सरकारकडे केली होती. मात्र, १५ ऑक्टोबरपासून हंगाम सुरू होण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही. आता हंगाम दसऱ्यानंतर एक नोव्हेंबरपासून सुरू होण्याची आणि दिवाळीनंतर गती येण्याची शक्यता जाणकार व्यक्त करीत आहेत. सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्याशी प्राथमिक बोलणी झाली आहेत. एक नोव्हेंबरपासून कारखाने सुरू करण्याची मागणी केली आहे.

येत्या काही दिवसांत मंत्री समितीच्या बैठकीत निर्णय होऊ शकतो. कारखान्यांनी गाळपाची तयारी पूर्ण केली आहे, अशी माहिती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाने महासंघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर यांनी दिली आहे.



### हंगामाची सुरुवात कधी होणार याबाबत अनिश्चितता वाढली

» आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या या उद्योगाचा यंदाचा गळीत हंगाम कधीपासून सुरू करणार हे अद्याप निश्चित होत नाही. त्यासाठीची मंत्री समितीची बैठक लांबणीवर पडली आहे. कारखानदारांनी हंगामाची तयारी केली आहे. ऊसतोड मजूर आणि वाहतूकदारांशी करार केले आहेत. तरीही हंगामाची सुरुवात कधी होणार, हे निश्चित नसल्यामुळे अनिश्चितता वाढली आहे. राज्यातील खासगी साखर कारखान्यांच्या वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने (विस्मा) १५ ऑक्टोबरपासून यंदाचा गळीत हंगाम सुरू करावा, अशी मागणी राज्य सरकारकडे केली होती. मात्र, १५ ऑक्टोबरपासून हंगाम सुरू होण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही. आता हंगाम दसऱ्यानंतर एक नोव्हेंबरपासून सुरू होण्याची आणि दिवाळीनंतर गती येण्याची शक्यता जाणकार व्यक्त करीत आहेत.

# पालिका उभारणा नवा हॉटमिक्स प्लांट!

## पाच कोटी रुपये खर्च करून नवा हॉटमिक्स प्लांट

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

शहरात प्रचंड खड्डे पडलेले असताना महापालिकेचा हॉट मिक्स प्लांट वारंवार बंद पडत आहे. त्यामुळे खड्डे बुजविण्याचे डांबरीकरणाचे काम ठप्प होत आहे. त्यावर उपाय म्हणून महापालिकेने पाच कोटी रुपये खर्च करून नवा हॉटमिक्स प्लांट उभारण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच हा जुना प्लांटसुद्धा दुरुस्त केला जाईल. शहरातील प्रमुख रस्त्यांसह छोट्या रस्त्यांना खड्डे पडल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळा संपल्यानंतर खड्डे बुजविण्याचे काम सुरु केले जाईल असा दावा पथ विभागाने केला होता. पण गेल्या आठवड्याभरापासून येरवडा येथील हॉटमिक्स प्लांटचे कंट्रोल पॅनेल खराब झाल्याने मंगळवारपासून (ता. ३) खडी मिश्रित डांबर तयार करण्याचे काम ठप्प झाले आहे. तात्पुरत्या स्वरूपात तेथील आणखी एक जुना प्लांट सुरु करून खड्डे बुजविण्याच्या काम संथ गतीने सुरु ठेवले आहे. मात्र, रोज एक हजार टन हॉट मिक्स डांबर तयार करण्याची क्षमता असलेला हा प्रकल्प बंद पडत असल्याने याचा फटका महापालिकेला बसत आहे. यापूर्वी ऑगस्ट महिन्यात हा प्लांट बंद पडला होता. महापालिका आयुक्त विक्रमकुमार म्हणाले, हॉट मिक्स प्लांटमधील बिघाड दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून, आजपासून हॉट मिक्स डांबर उपलब्ध झाले आहे. पण महापालिकेचा दुसरा आधुनिक तंत्रज्ञान असलेला हॉटमिक्स प्लांट असणे आवश्यक आहे. त्यासाठी पाच कोटी रुपये खर्च असून, त्यसाठी तातडीने प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश पथ विभागाला दिले आहेत. तसेच जुना प्लांटही अद्ययावत केला जाईल.



# पुणे मुंबई एक्स्प्रेस वेवर एक तासाचा विशेष ब्लॉक

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

आयटीएमएस प्रणालीच्या कामासाठी पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर गुरुवारी पुन्हा विशेष ब्लॉक घेतला जाणार आहे. पुण्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवर दुपारी १२ ते १ असा हा एक तासांचा हा ब्लॉक असणार आहे. अमृतांजन पुलाच्या अलीकडे अन पलीकडे म्हणजे किलोमीटर ४५/६००० व ४१/५०० किमीवर ओव्हरहेड गॅन्ट्री बसवली जाणार असल्याने हा ब्लॉक घेतला जाणार आहे. गॅन्ट्री बसविताना मुंबई वाहिनीवरील सर्व प्रकारची वाहतूक उर्से टोल नाका येथे तसेच शोल्डर लेन वर पूर्णपणे थांबविण्यात येणार आहे. फक्त कार साठी लोणावळा एक्झीट वरून जुन्या महामार्गावरून अंडा पॉईंट - मॅजिक पॉईंट वरून खोपोली शहरातून वळविण्यात येणार आहे,अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. काल देखील ग्रँटी टाकण्यासाठी विशेष ब्लॉक घेण्यात आला होता. दोन तासांसाठी घेण्यात आलेला ब्लॉक हा अर्ध्या तासात संपला. त्यामुळे हा ब्लॉक घेताना प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेण्यात आली आहे.